महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय,
जिल्हा उद्योग केंद्र,अकोला
पहिला मजला, भूविकास बँक इमारत, एस.पी.ऑफिस जवळ, अकोला

# जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) बैठक दिनांक 24-07-2023 चे इतिवृत्त

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (District Export Promotion Council) ची बैठक दिनांक 24-07-2023 रोजी दुपारी 12.00 वाजता मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन प्रकारे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रमाणे समितीचे सदस्य ऑनलाईन हजर होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्य चे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | मा. निमा अरोरा | मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती अकोला |
| 2 | श्रीमती स्नेहल वी. ढोके | सहाय्यक विदेश व्यापार महानिदेशक, विदेश व्यापार महानिदेशालय ( Director General of Foreign Trade), नागपुर |
| 3 | श्री. नागपाल सी. लोहकरे | प्रादेशिक प्रमुख, अँपेडा मुंबई |
| 4 | श्री. निलेश निकम | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र तथा सचिव ,जिल्हा निर्यात प्रचालन समिती अकोला |
| 5 | श्रीमती सोनिया अत्री | मुख्य व्यवस्थापक, निर्यात ऋण, स्टेट बँक ऑफ इंडीया, अकोला |
| 6 | श्रीमती ज्योती चोरे | अधिक्षकीय कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, अकोला |
| 7 | श्री. अंकीत गुप्ता | नोडल ऑफीसर, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, अकोला |
| 8 | श्री. उन्मेश मालू | अध्यक्ष, अकोला इंडस्ट्रीज असो. अकोला |
| 9 | श्री. नविन कृपलानी | प्रतिनिधी, अकोलावाला फुड प्रोसेसिंग असोशिएशन, अकोला |
| 10 | मा.संतोष बनसोड | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |
| 11 | श्री. सारंग पटले | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |
| 12 | श्री. प्रमोद गाडे | उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |
| 13 | कु. पुजा कडुकार | उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |
| 14 | कु. अंकीता पांचगे | उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |
| 15 | श्री.रसिक व-हाडे | टिप्पणी सहाय्यक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला |

मा. अध्यक्षांच्या परवानगीने व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. बैठकीत निर्यात प्रोत्साहन व अकोला जिल्हयातून एकूण निर्यात वाढीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली.

1. मा. सहाय्यक विदेश व्यापार महानिदेशक यांनी सुचविल्याप्रमाणे जिल्हयातील एकुण निर्यात वाढीकरिता ODOP उत्पादने यासोबत निर्यातक्षम प्रत्येक उत्पादनाचा विकास तसेच उत्पादन व बाजा

विविधीकरण यावर भर देण्याची आवश्यकत्ता अधोरेखित केली. त्यादृष्टीने विदेश व्यापार महानिदेशालय( Director General of Foreign Trade), नागपुर यांच्यातर्फे Export Outreach Programme आयोजित केले जात असुन ऑगस्ट 2023 च्या पहिल्या आठवडयात सदर कार्यक्रम अकोला जिल्हयात घेण्याचे नियोजित आहे.

2. उपरोक्त कार्यक्रमात निर्यातक्षम अथवा निर्यातीस इच्छुक औद्योगिक घटकाना निर्यातीस आवश्यक विविध प्रक्रिया जसे कि नोदणी, अनुज्ञप्ती, कर्ज,ब्रँडींग पॅकेजींग, Buyers इत्यादी बद्दल मार्गदर्शन करण्यात येणार असून जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी सदर नियोजित कार्यक्रमात नवउद्योजक, कृषी विद्यापीठ व तंत्रशिक्षण संस्था मधील विद्यार्थी यांना सहभागी करून घेण्याकरिता कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्यात येईल.

3. मा. सहाय्यक विदेश व्यापार महानिदेशक यांनी बैठकीस उपस्थित उद्योगांचे प्रतिनिधी यांना निर्यात सुलभीकरण करिता भारत सरकार व्दारे राबविण्यात येणा-या विविध निर्यात प्रोत्साहनपर योजना EPCB, Advance Authorization इत्यादी ची माहिती दिली.

4. प्रादेशिक प्रमुख, ॲपेडा मुंबई यांनी सांगितल्याप्रमाणे अकोला जिल्हयातील एकूण निर्यातीत अन्न प्रक्रीया क्षेत्राच्या वाटा 29% असुन त्यात वाढ करण्याकरिता जिल्हयातील सदर क्षेत्रात कार्यरत निर्यातदार व उद्योग घटक यांना ॲपेडा व्दारे आवश्यक ते सर्व साहाय्य उपलब्ध आहे त्याअनुषंगाने जिल्हयात कार्यरत अशा उद्योग घटकाची माहिती पुरविण्याचे जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांस सुचित केले. सदर माहिती ॲपेडा, मुंबई यांना पुरविण्यात येईल.

5. अन्न प्रक्रीया क्षेत्रात विविध नवोन्मेषाच्या संधी जिल्हयात उपलब्ध आहेत. अकोला जिल्हयात डाळी (Pulses) हे ODOP उत्पादन असून त्यात मुल्यवर्धन करून आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी असलेले उत्पादन जसे की Plant Based Protein च्या विकासास वाव असल्याचे प्रादेशिक प्रमुख, ॲपेडा मुंबई यांनी निर्दशनास आणुन त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचे सर्व सहभागी सदस्यांना सुचित केले.

6. अकोला जिल्हयात Plant Based Protein Extraction साठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसल्याचे अध्यक्ष, अकोला इंडस्ट्रीज असो. अकोला यांनी निर्दशनास आणले. प्रादेशिक प्रमुख, ॲपेडा मुंबई यांनी जिल्हयातील इच्छुक उद्योगांनी Institute of Chemical Technology Mumbai व Central Food Technological Resarch Institute Hyderabad यांना तंत्रज्ञान हस्तांतरण करिता संपर्क साधण्याचे आवाहन प्रादेशिक प्रमुख, ॲपेडा मुंबई यांनी केले.

7. वरील प्रमाणे निर्यात संधी विकसित करण्याकरिता तसेच सेंद्रीय अन्न उत्पादने विकसित व प्रोत्साहित करण्याकरिता FPO (शेतकरी उत्पादक संघ) यांचा सक्रिय सहभाग साध्य करण्यात येईल.

8. निर्यात प्रोत्साहन व वाढीकरिता वित्तीय संस्था व बँक यांच्या व्दारे पुरविण्यात येणा-या कर्ज सुविधांची माहिती मुख्य व्यवस्थापक, निर्यात ऋण, स्टेट बँक ऑफ इंडीया, अकोला यांनी सहभागी सदस्यांना दिली. हयात Pre-shipment आणि Post-shipment Export Packing Credit तसेच Export Bill Rediscounting यांचा समावेश होतो.

9. वरील नमूद Export Bill Rediscounting सुविधा जिल्हा स्तरावर उपलब्ध झाल्यास निर्यातदारांना अधिक सोईस्कर होईल असे उद्योग प्रतिनिधी यांनी सुचवले. त्यावर मुख्य व्यवस्थापक, निर्यात ऋण, स्टेट बँक

ऑफ इंडीया यांनी जिल्हयातुन मोठयाप्रमाणत निर्यात होत असल्यास त्याबाबत विचार करण्यात येईल, असे कळविले.

10. जिल्हयातील नव उद्योजक यांनी निर्यातक्षम बनण्याकरिता क्षमता बांधणी प्रशिक्षण ज्यामध्ये Market Awareness Development, Buyer Seller meets, Participation in International Trade Fairs चा समावेश होतो, घेणे करिता नवउद्योजकांनी MSME DI चे योजनाचा लाभ घेणेच्या दृष्टीने कार्यशाळा आयोजित करण्याचे नियोजन करण्यात येईल.

11. मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी आदेशित केल्या नूसार DEPC बैठक दर महिन्यात घेण्याचे नियोजित असुन समितीच्या सर्व सदस्यांनी सदर बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

24.7

सचिव, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,
तथा महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अकोला